# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
**दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/६५/६९ फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६**
**ई-मेल** : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेत-स्थळ** : www.mercindia.org.in/www.merc.gov.in

जाहिरात क्र. २०/२०१८-१९

## जाहीर नोटीस

**प्रारूप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (लक्ष्मीपती बालाजी सप्लाय चेन मॅनेजमेंट लि. च्या साई गाव, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड येथील मुक्त व्यापार व वखार आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१९ वर जनतेकडून अभिप्राय मागविण्याबाबत.**

लक्ष्मीपती बालाजी सप्लाय चेन मॅनेजमेंट लि. यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) अधिनियम, २००५ अंतर्गत साई गाव, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड येथे स्थित असलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राकरीता ''सह-विकासक'' म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४(बी) सह एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील उप-कलम (१) नुसार, लक्ष्मीपती बालाजी सप्लाय चेन मॅनेजमेंट लि. हे, भारत सरकारच्या एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एसईझेड क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्याकरीता, एक मानीव वीज वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने, सन २०१८ च्या प्रकरण क्र. २७५ मध्ये दि. १७ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये लक्ष्मीपती बालाजी सप्लाय चेन मॅनेजमेंट लि. यांच्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (लक्ष्मीपती बालाजी सप्लाय चेन मॅनेजमेंट लि. च्या साई गाव, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड येथील मुक्त व्यापार व वखार आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१९ चे प्रारूप तयार केले आहे. या प्रारूप विनियमांची प्रत आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेतस्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे. उपरोक्त प्रारूपावर अभिप्राय, सूचना किंवा हरकती (१+६ प्रतींमध्ये), **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०००05** येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स - ०२२-२२१६३९७६; ई-मेल : mercindia@merc.gov.in) द्वारा या पत्त्यावर **दि. १० फेब्रुवारी, २०१९** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

**१० फेब्रुवारी, २०१९ रोजी किंवा पूर्वी प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि/किंवा हरकती आयोगाद्वारे विचारात घेतल्या जातील.**

**स्थळ - मुंबई** | **सचिव,**
**दिनांक :- ०९ जानेवारी, २०१९** | **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size 8 X 17**